MHKO100001822010

**नियमीत दिवाणी दावा क्र. ४५/२०१०**

नागव्वा दुंडाप्पा जांगनूरे वगैरे.
// विरुध्द//
लकाप्पा मार्तंडा जांगनूरे वगैरे.

**निशाणी क्र.५४ आणि ५५ खालील आदेश**

वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशिर माफ होणेसाठी व दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द होऊन मिळणेसाठी विनंती केलेली आहे.

०२. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ लकाप्पा मार्तंडा जांगनुरे हे दिनांक १६/०९/२०२१ रोजी मयत झाले आहेत. वादी यांना वारस अभिलेखावर आणावे लागतात याची माहिती नसलेने त्याबाबतची माहिती त्यांनी वकीलांना मुदतीत दिलेली नाही. तसेच, वादी ही कन्नड भाषिक असुन ती वयोवृध्द आहे. तिला मुदतीत मयताचा दाखला मिळाला नाही. तसेच, दरम्यानचे काळात एस.टी.महामंडळाचा संप असलेने दळणवळण बंद असलेने वादीला वकीलांना भेटता आले नाही. त्यामुळे दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश झालेला आहे. प्रतिवादी क्र.१ यांचे वारसांना अभिलेखावर आणलेमुळे प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. तसे न झाल्यास वादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, वादी यांनी त्यांचे विरुध्द झालेला दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द करुन वारस अभिलेखावर आणण्यासाठी झालेला विलंब माफ करुन मागितलेला आहे.

०२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दिले व असे कथन केले की, प्रस्तुत आर्जात नमुद केलेली कारणे संयुक्तीक नाहीत. प्रतिवादी क्र.१ हे मयत झाले त्यावेळी कोरोना नव्हता, त्यामुळे जनजिवन सुरुळीत झालेले होते. तसेच, वादी ही सुध्दा तारखेला येत होती. दिनांक २०.१२.२०२१ रोजी प्रतिवादी क्र.१ हे मयत असलेबाबत सांगितले होते. परंतु, वादी यांनी जाणूनबुजून वेळेत वारस अभिलेखावर आणले नाहीत. केवळ वादी यांच्या निष्काळजीपणामुळे काम लांबविणेसाठी मयताचे वारस मुदतीत अभिलेखावर आणलेले नाहीत. सबब, प्रतिवादी यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०३. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द वाटपासाठी व हक्कज्ञापनासाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, प्रतिवादी क्र.१ लकाप्पा मार्तंडा जांगनुरे हे

दिनांक १६/०९/२०२१ रोजी मयत झालेले आहेत व सदरचे अर्ज हे दिनांक २६/०९/२०२२ रोजी दाखल केलेले आहेत. मुदतीचे अधिनियम १९६३ चे आर्टीकल १२० प्रमाणे वादीने, प्रतिवादीच्या मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसामध्ये वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. तसेच, मुदतीत वारस अभिलेखावर न घेतल्यास आदेश २२, नियम ४ प्रमाणे तो दावा मयत प्रतिवादीविरुध्द दावा अवसान (Abate) होतो. आदेश २२, नियम ४ (५) (ब) प्रमाणे वादी उशिराबाबत संयुक्त कारण दाखवत असेल तर न्यायालयाला विलंब माफ करुन वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देता येईल. त्याप्रमाणे प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, वादी यांना बराच विलंब झालेला आहे. त्याबाबत वादी यांनी मुदतीचे अधिनियम १९६३ चे कलम ५ प्रमाणे संयुक्त कारण दिलेले आहे का हे पाहणे गरजेचे आहे. वादी यांचे असे कथन आहे की, त्यांना वारस अभिलेखावर आणावे लागतात याची माहिती नसलेने त्याबाबतची माहिती त्यांनी वकीलांना मुदतीत दिलेली नाही. तसेच, वादी ही कन्नड भाषिक असुन ती वयोवृध्द आहे. तिला मुदतीत मयताचा दाखला मिळाला नाही. तसेच, दरम्यानचे काळात एस.टी.महामंडळाचा संप असलेने दळणवळण बंद असलेने वादीला वकीलांना भेटता आले नाही. त्यामुळे, त्यांना मुदतीत अर्ज दाखल करता आलेले नाहीत असे कारण नमुद केलेले आहे. सदर कारण व विलंबाचा काळ पाहता वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक कारण नाही. परंतु, प्रकरणाची गुणदोषावर निर्गती करण्याकरीता प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे व अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत वादी यांचेवर अर्जाचा खर्च ठेवून त्याची भरपाई प्रतिवादी यांना देणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

०१. अर्ज रक्कम रु. १,०००/- (रुपये एक हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहेत.

०२. प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द करण्यात येत आहे.

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2022.11.19 17:42:18 +0530

( एस.ए.राठोड )
३रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १९/११/२०२२.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S.A.Rathod,<br>2$^{nd}$ Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 19/11/2022 |
| Order signed by P.O. on | 19/11/2022 |
| Order uploaded on | 19/11/2022 |